2 1 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# 'सीडीएसएल' - शिवाजी विद्यापीठात सामंजस्य करार

## करारामुळे विद्यापीठाची वाटचाल जोमाने होईल : प्रभारी कुलगुरू डॉ. मोरे यांचा विश्वास; विद्यार्थ्यांना अधिकृत प्रमाणपत्रे आता सहज उपलब्ध

प्रतिनिधी
कोल्हापूर

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड मुंबई अर्थात 'सीडीएसएल'सारख्या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजीटल वाटचाल अधिक जोमाने होईल, असा विश्वास प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केला. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ आणि सीडीएलएस यांच्यादरम्यान 'नॅशनल केडेमिक डिपॉझिटरी"मध्ये समाविष्ट होण्यासंदर्भात सामंजस्य करार झाला. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील १७वे विद्यापीठ ठरले आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ आणि सीडीएसएलयांच्यातील कराराचे आदान - प्रदान करताना प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे आणि सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक पी. एस. रेड्डी. सोबत परीक्षा नियंत्रक महेश काकडे व डॉ. विलास नांदवडेकर.

या प्रसंगी बोलताना डॉ. मोरे म्हणाले, "केंद्र सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत केलेल्या डिजिटलायझेशनच्या आवाहनाला प्रतिसादादाखल कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पुढाकारातून सामंजस्य करार साकार होतो आहे. विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके, तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल स्वरुपात उपलब्ध करून देण्याचा हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्या दृष्टीने ही 'वन स्टॉप केडेमिक डिपॉझिटरी'ची सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाची ठरणार आहे."

यावेळी सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पी.एस. रेड्डी म्हणाले, "महाराष्ट्रातल्या अग्रगण्य अशा शिवाजी विद्यापीठाशी जोडले जाण्याचा आनंद मोठा आहे. सिक्युरिटीज डिपॉझिटरीच्या धर्तीवर शैक्षणिक प्रमाणपत्रांची डिपॉझिटरी निर्माण करण्याचा प्रकल्प हाती घेतल्याने त्या जबाबदारीची जाणीवही मोठी आहे."

परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी यावेळी सदर सामंजस्य कराराचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, "केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशींप्रमाणे केलेल्या आवाहनानुसार देशातील सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांनी नॅशनल केडेमिक डिपॉझिटरी (एन.ए.डी.) मध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया" उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे इत्यादी माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्न करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार ही माहिती त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकेल. त्यानुसार केंद्रीय मंत्रालयाने नेमून दिलेल्या सीडीएसएल कंपनीशी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे."

यावेळी काकडे पुढे म्हणाले, "प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच; शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील."

या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी, तर सीडीएसएलकडून श्री. रेड्डी यांनी स्वाक्षरी केली. या प्रसंगी कंपनीचे इन्स्टिट्यूशनल बिझनेस हेड सुधीर सरकार, अजित मंजुरे, कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे आर.डी. सावंत, डॉ. जे.एस. बागी, डॉ. मिलिंद जोशी यांच्यासह परीक्षा विभागातील अधिकारी व प्रशासकीय सेवक उपस्थित होते..

21 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

सकाळ

# संशोधन फुलवण्यासाठी आता मशागत

## प्राध्यापकांना एक लाख, तर विद्यार्थी संशोधकांना दिला जाणार ५० हजार रुपयांचा पुरस्कार

**संदीप खांडेकर : सकाळ वृत्तसेवा**

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाशी संलग्नित महाविद्यालयांत संशोधनाचा अंकुर फुलावा, यासाठी विद्यापीठच प्रयत्न करणार आहे. त्यासाठी उत्कृष्ट प्राध्यापक व उत्कृष्ट विद्यार्थी संशोधक यांची निवड केली जाणार असून, प्राध्यापकांना एक लाख, तर विद्यार्थ्यास पन्नास हजार रुपयांचा पुरस्कार दिला जाणार आहे.

विद्यापीठ कॅम्पसमधील विविध अधिविभागांत प्राध्यापकांचे संशोधन कार्य सुरू असते. त्यांना विद्यापीठ अनुदान आयोगासह (यूजीसी) विविध योजनांच्या माध्यमातून संशोधनासाठीचे अनुदान मिळते. विद्यापीठाशी संलग्नीत सुमारे २८१ महाविद्यालयांतील संशोधनात प्राध्यापक अथवा विद्यार्थी 'इंटरेस्ट' किती घेतात अथवा त्यांना शैक्षणिक कामातून त्यासाठी किती वेळ मिळतो, याचा अंदाज मात्र येत नाही. त्यातून किती संशोधन प्रकल्प झाले, त्यांची गुणवत्ता किती, याचा ताळमेळही विद्यापीठ प्रशासनाला बांधता येत नाही. महाविद्यालयीन स्तरावरही संशोधनाची आवड विद्यार्थ्यांना लागावी आणि प्राध्यापकांनी संशोधन कार्यात झोकून द्यावे, यासाठी पाऊल टाकावे, अशी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची इच्छा होती. प्रशासन स्तरावर त्यासंबंधीची चर्चा केल्यानंतर त्याविषयीचा एक निश्चित आराखडा तयार केला आहे. येत्या शैक्षणिक वर्षात संशोधन करू इच्छिणाऱ्या प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी संशोधनासाठीचे प्रस्ताव विद्यापीठ प्रशासनाला सादर करायचे आहेत. त्यांनी संशोधनाच्या विषयाची निवड करायची असून, विद्यापीठ स्तरावर त्याची तज्ज्ञांकडून छाननी केली जाणार आहे तसेच तज्ज्ञ आवश्यक ते मार्गदर्शनही करणार आहेत. प्राध्यापक व विद्यार्थ्यांनी दोन वर्षांत संशोधन प्रकल्प पूर्ण करायचा आहे. प्रकल्प जर दोन वर्षांत पूर्ण होत नसेल, तर त्यासाठी सहा महिन्यांची मुदतवाढ दिली जाणार आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर तज्ज्ञ समिती त्यातून उत्कृष्ट संशोधन प्रकल्पाचा शोध घेणार आहे.

> **विद्यार्थ्यांनी एमए, एमकॉम, एमएस्सी झाल्यानंतर संशोधनाकडे वळण्यापूर्वी महाविद्यालयीन स्तरावरच त्यांच्या हातून संशोधन कार्य होणे अपेक्षित आहे. गुणवत्तापूर्ण संशोधनासाठी नक्की काय करावे, हे त्यांना कळाले, की संशोधन प्रकल्पांचा आकडाही वाढत राहील.**
> **- डॉ. डी. आर. मोरे,**
> बीसीयूडी संचालक

# पदवी प्रमाणपत्रे मिळणार डिजिटल




**कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ व सीडीएसएल कंपनीत शुक्रवारी सामंजस्य करार झाला. या वेळी डॉ. डी. आर. मोरे, पी. एस. रेड्डी, महेश काकडे, सुधीर सरकार, अजित मंजुरे, आर. डी. सावंत, डॉ. जे. एस. बागी, डॉ. मिलिंद जोशी.**

कोल्हापूर, ता. २० : सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेडसारख्या (सीडीएसएल) महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने होईल, असा विश्वास बीसीयूडीचे संचालक डॉ. डी. आर. मोरे यांनी आज येथे व्यक्त केला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात विद्यापीठ आणि सीडीएलएस यांच्यादरम्यान 'नॅशनल केडेमिक डिपॉझिटरी'मध्ये समाविष्ट होण्यासंदर्भात सामंजस्य करार झाला. त्या वेळी ते बोलत होते. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे विद्यापीठ देशातील सतरावे विद्यापीठ ठरले आहे.

सीडीएसएलचे मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एस. रेड्डी म्हणाले, ''महाराष्ट्रातल्या अग्रगण्य अशा विद्यापीठांशी जोडले जाण्याचा आनंद मोठा आहे. सिक्युरिटीज डिपॉझिटरीच्या धर्तीवर शैक्षणिक प्रमाणपत्रांची डिपॉझिटरी निर्माण करण्याचा प्रकल्प हाती घेतल्याने त्या जबाबदारीची जाणीवही मोठी आहे.'' परीक्षा नियंत्रक महेश



काकडे यांनी सामंजस्य कराराचे स्वरूप व महत्त्व स्पष्ट केले. ते म्हणाले, ''केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशींनुसार केलेल्या आवाहनानुसार देशातील सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांनी नॅशनल केडेमिक डिपॉझिटरी (एन. ए. डी.) मध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' उपक्रमाअंतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे इत्यादी माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार सदर माहिती त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकतील. कंपनीच्या प्रणालीमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा डाटा डिजिटल स्वरूपात अपलोड करण्यात येईल. प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील.''

करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी तर सीडीएसएलकडून श्री. रेड्डी यांनी स्वाक्षरी केल्या. या वेळी कंपनीचे इन्स्टिट्यूशनल बिझनेस हेड सुधीर सरकार, इन्व्हेस्टर एज्युकेशन हेड अजित मंजुरे, कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव आर. डी. सावंत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे. एस. बागी, डॉ. मिलिंद जोशी उपस्थित होते.

21 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

महाराष्ट्र टाईम्स

# 'डिजिटल वाटचाल जोमात होईल'

**म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर**

'सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस (इंडिया) लिमिटेड, मुंबई (सीडीएसएल)सारख्या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसमवेत शिवाजी विद्यापीठाच्या झालेल्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने होईल,' असा विश्वास प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी शुक्रवारी येथे व्यक्त केला. विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात शिवाजी विद्यापीठ आणि सीडीएलएस यांच्यादरम्यान 'नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी'मध्ये समाविष्ट होण्यासंदर्भात सामंजस्य करार झाला. त्यावेळी ते बोलत होते.

**शिवाजी विद्यापीठाचा 'सीडीएलएस'शी सामंजस्य करार**




सीडीएसएल आणि शिवाजी विद्यापीठ यांच्यातील सामंजस्य कराराची प्रक्रिया पूर्ण करताना डॉ. डी. आर. मोरे, पी. एस. रेड्डी, महेश काकडे, आदी.

डॉ. मोरे म्हणाले, 'केंद्र सरकारने डिजिटल इंडिया मोहिमेअंतर्गत केलेल्या डिजिटायझेशनच्या आवाहनाला प्रतिसादादाखल विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्या पुढाकारातून आजचा सामंजस्य करार साकार होतो आहे. विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्या दृष्टीने ही 'वन स्टॉप ॲकॅडेमिक डिपॉझिटरी'ची सुविधा महत्त्वाची ठरणार आहे.'

यावेळी सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक पी. एस. रेड्डी म्हणाले, 'महाराष्ट्रातील अग्रगण्य अशा शिवाजी विद्यापीठाशी जोडले जाण्याचा आनंद मोठा आहे. सिक्युरिटीज डिपॉझिटरीच्या धर्तीवर शैक्षणिक प्रमाणपत्रांची डिपॉझिटरी निर्माण करण्याचा प्रकल्प हाती घेतल्याने त्या जबाबदारीची जाणीवही मोठी आहे. या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्राच्या सक्षमीकरणास चालना मिळेल.'

परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, 'केंद्र सरकारच्या 'डिजिटल इंडिया' उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे, आदी माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. विद्यार्थ्यांच्या गरजेनुसार माहिती त्यांच्या पुढील शिक्षण, नोकरी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकेल. प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळविता येऊ शकतील.'

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

पुण्यनगरी

# शिवाजी विद्यापीठाचा 'सीडीएसएल'समवेत सामंजस्य करार

## पदवी प्रमाणपत्रे मिळणार डिजिटल स्वरूपात

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

सेंट्रल डिपॉझिटरी सर्व्हिसेस लिमिटेड, मुंबई अर्थात 'सीडीएसएल' या महत्त्वपूर्ण डिपॉझिटरी कंपनीसोबत शिवाजी विद्यापीठाच्या सामंजस्य करारामुळे विद्यापीठाची डिजिटल वाटचाल अधिक जोमाने होईल, असा विश्वास प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे यांनी व्यक्त केला.

विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषद सभागृहात शुक्रवारी शिवाजी विद्यापीठ आणि सीडीएलएस यांच्या दरम्यान 'नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरी'मध्ये समाविष्ट होण्यासंदर्भात सामंजस्य करार झाला, त्यावेळी ते बोलत होते. अशा प्रकारचा सामंजस्य करार करणारे शिवाजी विद्यापीठ देशातील १७ वे विद्यापीठ ठरले आहे.

डॉ. मोरे म्हणाले, विद्यार्थ्यांना त्यांची पदवी प्रमाणपत्रे, गुणपत्रके तसेच अन्य शैक्षणिक प्रमाणपत्रे डिजिटल स्वरूपात उपलब्ध करून देण्याचा हा अत्यंत महत्त्वाकांक्षी प्रकल्प आहे. त्या दृष्टीने ही 'वन स्टॉप ॲकॅडेमिक डिपॉझिटरी'ची सुविधा विद्यार्थ्यांच्या दृष्टीने खूप महत्त्वाची ठरणार आहे. पुढील काळात टप्प्याटप्प्याने शंभर टक्के डिजिटाईज्ड होण्याचा विद्यापीठाचा मानस आहे.

यावेळी सीडीएसएलचे व्यवस्थापकीय संचालक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी पी. एस. रेड्डी म्हणाले, शिवाजी विद्यापीठाशी जोडले जाण्याचा आनंद आहे. सिक्युरिटीज डिपॉझिटरीच्या धर्तीवर शैक्षणिक प्रमाणपत्रांची डिपॉझिटरी निर्माण करण्याचा प्रकल्प हाती घेतल्याने त्या जबाबदारीची जाणीवही मोठी आहे. तथापि, या उपक्रमामुळे शैक्षणिक क्षेत्राच्या सक्षमीकरणास चालना मिळेल.



**कोल्हापूर : सामंजस्य करारप्रसंगी प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे, सीडीएसएलचे सीईओ पी. एस. रेड्डी, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर आदी.**

परीक्षा नियंत्रक महेश काकडे म्हणाले, केंद्रीय मनुष्यबळ विकास मंत्रालय आणि विद्यापीठ अनुदान आयोग यांनी राजेश अग्रवाल समितीच्या शिफारशींनुसार केलेल्या आवाहनानुसार देशातील सर्व शैक्षणिक संस्था, विद्यापीठे यांनी नॅशनल ॲकॅडेमिक डिपॉझिटरीमध्ये समाविष्ट होणे आवश्यक आहे. डिजिटल इंडिया उपक्रमांतर्गत देशातील सर्व विद्यार्थ्यांची अंतिम गुणपत्रके, दीक्षान्त प्रमाणपत्रे आदी माहिती आधार कार्ड क्रमांकाशी संलग्नित करून राष्ट्रीय डाटाबेसमध्ये ठेवली जाईल. ही माहिती त्यांच्या पुढील शिक्षणासाठी, नोकरीसाठी व प्रमाणपत्रे तपासणीसाठी डिजिटल माध्यमातून वापरता येऊ शकतील. त्यानुसार केंद्रीय मंत्रालयाने नेमून दिलेल्या सीडीएसएल या कंपनीशी विद्यापीठाने सामंजस्य करार केला आहे. यानुसार कंपनीच्या प्रणालीमध्ये विद्यापीठातील विद्यार्थ्यांचा डाटा डिजिटल स्वरूपात अपलोड करण्यात येईल. प्राथमिक टप्प्यात प्रायोगिक तत्त्वावर विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागातील विद्यार्थ्यांना डिजिटल पदवी प्रमाणपत्रे देण्याचा उपक्रम राबविण्यात येईल. त्यानंतर टप्प्याटप्प्याने सर्व स्नातकांपर्यंत याची व्याप्ती वाढविण्यात येईल. यामुळे कागदावरील खर्च वाचेलच, शिवाय विद्यार्थ्यांना त्यांची अधिकृत प्रमाणपत्रे जगाच्या पाठीवर कोठूनही मिळवता येऊ शकतील.

या सामंजस्य करारावर विद्यापीठाच्या वतीने कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर यांनी, तर सीडीएसएलकडून रेड्डी यांनी स्वाक्षऱ्या केल्या. या प्रसंगी कंपनीचे इन्स्टिट्यूशनल बिझनेस हेड सुधीर सरकार, इन्व्हेस्टर एज्युकेशन हेड अजित मंजुरे, कासेगाव एज्युकेशन सोसायटीचे सचिव आर. डी. सावंत, तंत्रज्ञान अधिविभागाचे संचालक डॉ. जे .एस. बागी, डॉ. मिलिंद जोशी यांच्यासह परीक्षा विभागातील अधिकारी व प्रशासकीय सेवक उपस्थित होते.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

पुण्यनगरी

# व्यक्तिमत्त्व विकासासाठी आत्मविश्वास गरजेचा : काकडे

**गारगोटी / प्रतिनिधी :**

व्यक्तिमत्त्व विकासासाठी आत्मविश्वास व प्रयत्नांची पराकाष्ठा करणे गरजेचे आहे. यासाठी स्वनियंत्रण महत्त्वाचे असून विद्यार्थ्यांनी आंतरप्रेरणा जागृत ठेवावी, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठाचे परीक्षा नियंत्रक महेश काकडे यांनी केले. विद्यावर्धिनी इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी, पाल येथील वार्षिक स्नेहसंमेलनाच्या उद्‌घाटनप्रसंगी ते बोलत होते. यावेळी आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋचा पुजारी, उद्योजक आय. ए. पाटील, संजीव तुनगटकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

ग्रामीण भागात विद्यावर्धिनी नक्कीच आदर्शवत ठरेल, असा विश्वास काकडे यांनी यावेळी व्यक्त केला. उद्योजक आय. ए. पाटील यांनीही मनोगत व्यक्त केले. विद्यार्थ्यांनी स्वतःचा व्यवसाय सुरू करण्याची मानसिकता तयार करावी, असा सल्ला त्यांनी दिला. पारितोषिक वितरण आंतरराष्ट्रीय बुद्धिबळपटू ऋचा पुजारी यांच्या हस्ते करण्यात आले.

यावेळी संस्थेचे प्रमुख इंजि. एम. पी. बाऊस्कर, संस्था प्रतिनिधी डी. वाय. देसाई, एन. एस. हिरुगडे आदी उपस्थित होते. प्राचार्य डी. बी. केस्ती यांनी प्रास्ताविक केले. उपप्राचार्य डी. व्ही. रेपे यांनी आभार मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

पुढारी

# इतिहास संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य

## डॉ. पवार : विद्यापीठात मोडी लिपी शिबिर

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इतिहास संशोधनात मोडी कागदपत्रांचे महत्त्व अमूल्य आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ इतिहास संशोधक डॉ. जयसिंगराव पवार यांनी येथे केले. शिवाजी विद्यापीठ प्रौढ आणि निरंतर शिक्षण व विस्तार कार्य विभाग आणि राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनी यांच्या वतीने आयोजित मोडी लिपी माजी विद्यार्थी मागोवा शिबिरात डॉ. पवार बोलत होते.

विद्यापीठाच्या राजर्षी शाहू सभागृहात झालेल्या या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी विद्यापीठाचे प्रभारी कुलगुरू डॉ. डी. आर. मोरे होते.

डॉ. मोरे म्हणाले, इतिहास हा जेत्यांच्या बाजूने लिहिला जातो. यामुळे इतिहास पुनर्लेखनाची गरज निर्माण झालेली आहे. यासाठी मोडी दस्तऐवजांची गरज लागते. आजच्या काळात उर्दू, अर्धमागधी, पाली या भाषांचा स्रोत कमी होत चालला आहे. त्यांच्या अभ्यासाला चालना देण्याची गरज आहे. ते काम विद्यापीठ करत आहे.

कार्यक्रमाच्या दुसऱ्या सत्रात उदयसिंह राजेयादव यांचे 'मोडी लिपी कागदपत्रे : सद्यःस्थिती, लेखन-वाचन व प्रशस्ती' या विषयावर व्याख्यान झाले. यावेळी ग्रंथपाल डॉ. नमिता खोत अध्यक्षस्थानी होत्या. नवीनकुमार माळी यांचे 'मोडी लिपी - आधुनिक संगणकीय प्रवाह आणि तंत्रज्ञान' या विषयावर व्याख्यान झाले. अध्यक्षस्थानी डॉ. अरुण शिंदे होते.

यावेळी विभागप्रमुख डॉ. सुमन बुवा यांच्यासह राष्ट्रीय मोडी इतिहास प्रबोधिनीचे अध्यक्ष उदयसिंह राजेयादव, वसंत सिंघण यांनी मनोगत व्यक्त केले. विजय जाधव यांनी सूत्रसंचालन केले; तर, आदित्य मैंदर्गीकर यांनी आभार मानले. यावेळी आर. एस. कुलकर्णी, अशोक सडोलीकर, पीर महमद नवाब, सुनील मोहिते, मनवीर केसरकर, वीरेंद्र सोलापुरे यांच्यासह अनेक मोडी साधक उपस्थित होते.

21 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

तरुण भारत

# तृतीयपंथीयांना आजही नकारात्मक वागणूक

## शिवाजी विद्यापीठातील कार्यक्रमात बिंदूमाधवजी खिरे यांचे प्रतिपादन

प्रतिनिधी
कोल्हापूर

समाजामधून तृतीयपंथीयांना मिळणारी नकारात्मक वागणूक, नोकरीच्या संधी न मिळणे, यामुळे हा घटक समाजाकडे सकारात्मक दृष्टीकोनातून पाहू शकत नाही. यामध्ये बदल घडवून आणण्याची गरज आहे. त्यासाठी त्यांना स्वीकारण्याची गरज आहे, असे प्रतिपादन विचारवंत बिंदूमाधवजी खिरे यांनी केले. शिवाजी विद्यापीठात आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते.

शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्रामार्फत लैंगिक अल्पसंख्याक व सामाजिक वंचितता या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होते. कार्यशाळेचे उद्घाटन समपथिक ट्रस्ट पुणे येथील बिंदूमाधवजी खिरे यांच्या बीजभाषणाने झाले. उद्घाटनाच्या सत्राचे अध्यक्षपद डॉ. रमेश दांडगे यांनी भूषवले. बीजभाषणामध्ये खिरे यांनी लैंगिक अल्पसंख्यांक व त्यांचे प्रकार यांबद्दल उहापोह केला. लैंगिक अल्पसंख्याक वर्गामध्ये जे जन्मताच लैंगिकतेच्या चौकटीत बसत नाहीत त्यांची वर्गवारी प्रामुख्याने शारीरिक लिंग, लिंगभाव, लैंगिक ओढा या तीन घटकावर अवलंबून आहे. आज समाजामध्ये लैंगिक अल्पसंख्याकांची आवश्यकता काय, त्यांच्या अस्तित्वाची गरजच काय, असे प्रश्न उपस्थित केले जात आहेत. लिंग भाव काय आहे, तो स्वीकारणे, आणि समाजामध्ये उभे राहणे, हा एक गहन प्रश्न आहे, असेही त्यांनी यावेळी नमुद केले.

दुपारच्या सत्रामध्ये सुधीर आणि रावसाहेब या दोन तृतीयपंथीनी आपले प्रश्न मांडले. त्यांना स्वतःच्या अस्तित्वाबद्दल असणारी संदिग्धता, समाजाला त्यांच्याबद्दल असणारी संदिग्धता मोठी आहे. त्यांना समाजाबरोबरच घरच्यांकडून अपेक्षा आहेत. समाजाने आम्हाला स्वीकारलं पाहिजे, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली.

तिसऱ्या सत्रात समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी मानवनिर्मित तृतीय पंथी आणि सामाजिक शास्त्रीय अभ्यास अशी मांडणी केली. यामध्ये त्यांनी अंधश्रद्धा ही तृतीयपंथी व्यक्ती निर्माण करण्यास कशी कारणीभूत ठरते, त्याबद्दल उहापोह केला. तृतीयपंथीचे समावेशन किंवा पूनर्वसन हा मुख्य प्रश्न नसून अशा व्यक्ती निर्माण करण्यासाठी कारणीभूत असलेल्या अंधश्रद्धा ही खरी सामाजिक समस्या आहे, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमासाठी डॉ. एन. डी. पारेकर, डॉ. एन. पी. देसाई, ए. जी. भाले, शरद पाटील, श्रीधर साळोखे, रियाज कुरेशी यांनी सहकार्य केले.

21 JAN 2017

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

पुढारी

# दहा रुपयांत साठ कि.मी. प्रवास

## विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केली इको-फ्रेंडली बाईक

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

दहा रुपयांत साठ किलोमीटरचा प्रदूषणविरहीत प्रवास करणारी बाईक शिवाजी विद्यापीठाच्या तंत्रज्ञान अधिविभागाच्या चार विद्यार्थ्यांनी बनवली आहे. ही इलेक्ट्रिक बाईक फोल्डिंग करता येत असल्याने पार्किंगच्या समस्येवरही विद्यार्थ्यांनी या माध्यमातून उपाय शोधला आहे.

पेट्रोल व डिझेलच्या धुराने होणारे प्रदूषण जगभर कळीचा मुद्दा बनले आहे. दिल्लीत प्रदूषणाने नागरिकांचे जीवनमान धोक्यात आले आहे. दुसऱ्या बाजूला पार्किंगची समस्याही बिकट बनली आहे. या दोन्ही गोष्टींवर उपाय म्हणून शिवाजी विद्यापीठातील चार विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बाईकचा विचार करण्यासारखा आहे. कारण, ही बाईक इलेक्ट्रिक आहे. चार्जिंग केले की बाईक सुसाट धावू लागते. तसेच ही बाईक एखाद्या कागदासारखी दुमडता येते. ती फोल्ड करता येते. त्यामुळे या बाईकसाठी पार्किंगलाही जागा लागत नाही. एखाद्या भिंतीवर स्टँड करून ही बाईक अडकवता येते. यांत्रिकी-अभियांत्रिकी पदवीच्या चौथ्या वर्षातील शुभम साळुंखे, ओंकार भंडारे, तुषार भोसले, जॅकी गुरव या चार विद्यार्थ्यांच्या आद्याक्षरांवरून या बाईकला जेओएसटी-१६ असे नाव देण्यात आले आहे. इनोव्हेटिव्ह प्रोजेक्ट या अभ्यास उपक्रमांतर्गत या चार विद्यार्थ्यांनी कल्पकतेने बाईक तयार केली आहे.



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठ तंत्रज्ञान अधिविभागाच्या विद्यार्थ्यांनी तयार केलेली इको-फ्रेंडली बाईक अशा प्रकारे फोल्डिंग करता येते.

### अशी आहे बाईक

बॅटरीवर चालते, फोल्ड करता येते, बाईकचे वजन फक्त पन्नास किलो, सर्वसाधारण बाईकच्या सर्व सुविधा आहेत. स्क्रॅपच्या मटेरियलपासून बाईक बनवण्यात आली आहे.

> विद्यार्थ्यांनी तयार केलेल्या बाईकसाठी स्क्रॅप मटेरियलचा वापर केला आहे. अगदी कमी खर्चात तयार करण्यात आलेल्या या बाईकची रचना फोल्डिंगची केल्यामुळे पार्किंगच्या प्रश्नावर त्यांनी उत्तर शोधून दिले आहे. इको-फ्रेंडली असल्याने या बाईकमध्ये आणखी सुधारणा करून त्याचा वापर सर्वसामान्य लोकांना होईल या दिशेने विद्यार्थ्यांना मार्गदर्शन सुरू आहे.
>
> **- डॉ. जयदीप बागी**
> (संचालक, तंत्रज्ञान अधिविभाग)

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

2 1 JAN 2017

सकाळ

# पत्रकारांसाठीची कार्यशाळा आता मंगळवारी होणार

कोल्हापूर, ता. २० : शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्र विद्या आणि संवाद शास्त्र विभागातर्फे पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळा २३ ऐवजी २४ जानेवारीला होत आहे. वृत्तपत्रविद्या आणि संवाद शास्त्र विभागाने अलीकडेच युनिसेफ, महाराष्ट्रसोबत महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या भागीदारीअंतर्गत संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्ट पूर्तीसाठी विभागाकडून वर्षभर विविध उपक्रम होणार आहेत. उपक्रमाचा भाग म्हणून 'सामाजिक हिंसा आणि शोषण' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळा होणार आहे. या वेळी विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. यामध्ये सहभागी होण्यासाठी पत्रकारांना पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. इच्छुकांनी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधण्याचे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

तरुण भारत

# शिवाजी विद्यापीठात पत्रकारांसाठी कार्यशाळेचे आयोजन

**कोल्हापूर :** संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उदीष्टपूर्तीसाठी वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाच्यावतीने पत्रकारांसाठी २४ जानेवारी रोजी शिवाजी विद्यापीठात एकदिवसीय कार्यशाळा आयोजित करण्यात आली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या आणि संवादशास्त्र विभागाने अलिकडेच यूनिसेफ, महाराष्ट्र सोबत महत्वपूर्ण भागीदारी केली आहे. या भागीदारी अंतर्गत संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दीष्ट पूर्तीसाठी विभागाकडून वर्षभर विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून 'सामाजिक हिंसा आणि शोषण' या विषयावर विद्यार्थ्यांसाठी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. या कार्यशाळेत विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. कार्यशाळेत सहभागी होण्यासाठी पत्रकारांना पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या पत्रकारांनी विद्यापीठाच्या पत्रकारिता आणि मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधण्याचे आवाहन विभाग प्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2017

पुण्यनगरी

# विद्यापीठात मंगळवारी कार्यशाळा

**कोल्हापूर :** संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उद्दिष्टपूर्तीसाठी वृत्तपत्र विद्या आणि संवादशास्त्र विभागाच्या वतीने पत्रकारांसाठी एकदिवसीय कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. ही कार्यशाळा मंगळवार, दि. २४ जानेवारी रोजी शिवाजी विद्यापीठात होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

तरुण भारत

# एन. एस. एस. समन्वयकांसाठी २७ पासून कार्यशाळा

**कोल्हापूर :** संयुक्त राष्ट्र संघाच्या शाश्वत विकासाच्या उदिष्टपूर्तीसाठी वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागातर्फे महाविद्यालयीन एन.एस.एस. समन्वयकांसाठी २७ व २८ रोजी शिवाजी विद्यापीठात कार्यशाळा आयोजित केली आहे. शिवाजी विद्यापीठाच्या वृत्तपत्रविद्या व संवादशास्त्र विभागाने अलीकडेच युनिसेफ महाराष्ट्रासोबत महत्त्वपूर्ण भागीदारी केली आहे. या अंतर्गत विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा एक भाग म्हणून एन. एस. एस. समन्वयकांसाठी २७ व २८ जानेवारीरोजी कार्यशाळा होणार आहे. यावेळी विविध विषयांच्या तज्ज्ञांचे मार्गदर्शन लाभणार आहे. सहभागी होऊ इच्छिणाऱ्या एन. एस. एस. समन्वयकांनी पूर्व नोंदणी करणे आवश्यक आहे. त्यांनी विद्यापीठाच्या पत्रकारिता व मास कम्युनिकेशन विभागात संपर्क साधावा, असे आवाहन विभागप्रमुख डॉ. निशा पवार यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2017
महाराष्ट्र टाईम्स

## उद्या कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठातील भगवान महावीर अध्यासन व दक्षिण भारत जैन सभेच्या दिगंबर जैन बोर्डिंगच्यावतीने रविवारी (ता. २२) सकाळी ९ ते ५ या दरम्यान पत्रकारिता कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले आहे. कार्यशाळेचे उद्घाटन ज्येष्ठ पत्रकार जयसिंग पाटील यांच्या हस्ते होणार आहे. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ अर्थतज्ज्ञ डॉ. जे. एफ. पाटील भुषविणार आहेत. या कार्यशाळेत डॉ. महावीर अक्कोळे, प्राचार्य श्रीधर हेरवाडे, डॉ. पद्मजा पाटील, पत्रकार विश्वास पाटील, मोहन हवालदार, अनिल देशमुख मार्गदर्शन करणार आहेत. या कार्यशाळेत सहभागी होण्याचे आवाहन जैन सभेचे उपाध्यक्ष प्रा. डी. ए. पाटील यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
21 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

## सामाजिक वंचितता विषयावर कार्यशाळा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या सामाजिक वंचितता व समावेशक धोरण अभ्यासकेंद्रामार्फत 'लैंगिक अल्पसंख्याक व सामाजिक वंचितता' या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. समपथिक ट्रस्टचे प्रमुख बिंदूमाधवजी खिरे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. रमेश दांडगे होते. यावेळी समाजशास्त्र विभागप्रमुख डॉ. जगन कराडे यांनी 'मानवनिर्मित तृतीयपंथी आणि सामाजिक शास्त्रीय अभ्यास' अशी मांडणी केली. डॉ. एन. डी. पारेकर, डॉ. एन. पी. देसाई, ए. जी. भाले, शरद पाटील, श्रीधर साळोखे, रियाज कुरेशी यांनी संयोजन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

पुण्यनगरी

# गोखले महाविद्यालयात उद्या कौशल्य रोजगार मेळावा

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**

शिवाजी विद्यापीठ व गोखले महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार, २२ रोजी कौशल्य व रोजगार मेळाव्याचे आयोजन केले आहे. हा मेळावा रविवारी सकाळी ११ ते ४ या वेळेत गोपाळ कृष्ण गोखले महाविद्यालयात होणार आहे. मेळाव्यात ४२४ पदांसाठी भरती होणार आहे. इच्छुक उमेदवारांनी महारोजगारच्या संकेतस्थळावर ऑनलाईन अॅप्लाय करावे, असे आवाहन विद्यापीठाच्या कौशल्य विकास रोजगार केंद्राचे सहायक संचालक एस. टी. जाधव यांनी केले आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JAN 2017

महाराष्ट्र टाईम्स

## रविवारी रोजगार मार्गदर्शन मेळावा

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठ कौशल्य विकास रोजगार व उद्योजकता माहिती व मार्गदर्शन केंद्र आणि गोपाळ कृष्ण गोखले कॉलेज यांच्यावतीने रविवारी (ता. २२) गोखले कॉलेज येथे कौशल्य व रोजगार मेळावा होणार आहे. सकाळी दहा ते दुपारी चार या वेळेत होणाऱ्या या मेळाव्यात जिल्ह्यातील खासगी कंपन्या सहभागी होणार आहेत. यामध्ये विविध शैक्षणिक पात्रतेसाठी ४२४ पदांसाठी रोजगारांच्या संधी उपलब्ध होणार आहेत. आठवी, दहावी, बारावी उत्तीर्ण, आयटीआय पदविका, पदवी, पदव्युत्तर, एम. सी. ए., एम. बी. ए. बी. ई. सी. एस. ई., कंपनी सेक्रेटरी ही शैक्षणिक पात्रता असलेले विद्यार्थी या मेळाव्यासाठी नावनोंदणी करू शकतात.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 1 JAN 2017

पुण्यनगरी

# वरणगे पाडळी येथे डिजिटल साक्षरता रॅली

**खुपिरे / वार्ताहर :**

वरणगे पाडळी (ता. करवीर) येथे शिवाजी विद्यापीठाच्या इलेक्ट्रॉनिक्स आधिविभागामार्फत राष्ट्रीय योजनेंतर्गत डिजिटल साक्षरता व विशेष श्रमसंस्कार शिबिर आयोजित करण्यात आले होते.

शिबिराचे उद्घाटन शिवाजी विद्यापीठाचे विद्यार्थी कल्याण संचालक डॉ. आर. व्ही. गुरव यांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी पंचायत समिती सदस्य तानाजी आंग्रे, सरपंच नजमतबी मुल्लाणी, उपसरपंच अमित पाटील, शंकरराव पाटील, भारती पोवार, विद्या गायकवाड, सागर बुचडे आदी उपस्थित होते.

या शिबिराच्या माध्यमातून डिजिटल साक्षरता, कॅशलेस ट्रान्झॅक्शन, ई-गव्हर्नन्स, डिजिटल लॉकर, ग्रामसफाई, आरोग्यविषयक जनजागृती करण्यात आली. शिबिराचे प्रास्ताविक शिबिर संयोजक प्रा. एम. के. भामारकर यांनी केले. यावेळी उत्तम नलवडे, विनायक शिंदे यांच्यासह विद्यार्थी व ग्रामस्थ उपस्थित होते.

सूत्रसंचालन सोनाली लोहार व अपेक्षा पाटील यांनी केले. आभार रत्नदीप देशमुख यांनी मानले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

21 JAN 2017

पुण्यनगरी

# येळवण जुगाईत राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर

**येळवण जुगाई :** शिवाजी विद्यापीठ अंतर्गत येळवण जुगाई येथे राष्ट्रीय सेवा योजनेचे शिबिर झाले. या शिबिराच्या माध्यमातून विद्यार्थ्यांनी श्रमदान करत स्वच्छतेचा संदेश गावकऱ्यांना दिला.

व्याख्यान, प्रभातफेरी, रांगोळी, वादविवाद स्पर्धा, लोकनाट्य आदी कार्यक्रमांतून लोकसहभाग कसा वाढेल व त्यामुळे गावविकास कसा साधता येईल, याची उदाहरणे प्राचार्य माळी यांनी दिली. अशा प्रकारची शिबिरे प्रत्येक गावात व्हावीत, अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. सांस्कृतिक कार्यक्रमाने शिबिराची सांगता झाली.